No. 734

त्वरीत

जा. क्र. प्रा/प्रावि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक

D E SOCIETY POONA
Inward No. 877
Date 10 AUG 1987

NP & PPST
Inward ... 9
Dated 10/9/87

प्रति,

शिक्षणाधिकारी
[ प्राथमिक विभाग ]
जिल्हा परिषद पुणे.

विषय :- जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलसह २०८७ (३२६१) प्राशि-३ दि. चे पत्र दि. २०.७.८७.

उपरोक्त विषयाचे संबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकितकेलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८७ पासून प्राथ. शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- |
| डेक्कन एज्यु सोसा. पुणे-४. | पुणे-४. | इ. १ली ते ४थी. | इंग्रजी |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

४] तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर शि. उ. सं. पु. वि.
यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१ करिता

प्रत :- प्रशासनाधिकारी/महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ ........ ............... जिल्हा ................ याना माहिती साठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव/ ~~अध्यक्ष~~ डेक्कन एज्यु. सोसायटी, पुणे-४...........
.............................................
याना माहितीसाठी अग्रेषित.